साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११००

दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.sahsik.com




वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १३ अंक : ८८ शनिवार ५ ऑक्टोंबर २०१९ मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

## दिनविशेष

* महालक्ष्मी पूजन
* सरस्वती पूजन



## सुविचार

आपले लक्ष्य, साध्य विसरू नका. अन्यथा जे काही मिळाले तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल.

## चारोळी

आई सर्वांनाच हवी
असते आपली हाक
ऐकण्यासाठी
हवे तेव्हा आपल्यासाठी
आपले म्हणून
राहण्यासाठी .

## हसा जरा जपून..

**गुरूजी :** खरं सांग बंड्या, नाहीतर चड्डी काढून मारेन तुला...
**बंड्या :** पण गुरूजी, सगळी चुक माझी आहे तुम्हा का चड्डी काढताय...

# भारत सरकार व सर्वोच्च न्यायालयाचा विरोधी, सुपारीबाज, देशद्रोही वकिल, दलाल मिलींद साठेला अटक करण्यासाठी

# 'इंडियन बार असोसिएशन'ची सी.बी.आय. आणि सरन्यायाधीशांकडे तक्रार



* कोर्ट अवमाननाची याचिका सर्वोच्च न्यायालयात
* भ्रष्टाचाराने कोट्यावधीचे ऑफिस व इतर मालमत्ता प्रकरणी ईडी व सी.बी.आय.ने मिलींद साठेची नार्को चाचणी करण्याची विविध वकिल संघटनाची मागणी
* मिलींद साठे, फली नरीमण व त्यांच्या टोळीतील इतर देशद्रोही वकिलांविरुद्ध आणि लाईव्ह लॉ चे एम. ए.रशीद, निलाशीष चौधरी आर्दीविरुद्ध राजद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना त्वरीत अटक करण्याची मागणी
* बॉम्बे बार असोसिएशन व AAWI च्या अनेक सदस्यांतर्फे मिलींद साठे विरोधात सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद
* मिलींद साठे हे संघटनेच्या नावाचा दुरूपयोग करीत असून त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाईची मागणी
* देशद्रोही, भ्रष्टाचारी मिलींद साठेला शासनातर्फे, म्हाडातर्फे, बी.एम.सी. तर्फे कोणत्याही प्रकरणात वकिल म्हणून काम करू देवू नये अशी भाजपा व आर.पी.आय. कार्यकर्त्यांची मागणी
* देशद्रोह्यांना मदत करण्यासाठी वेळोवेळी वृत्त प्रकाशित करणारे लाईव्ह लॉ चे मालक एम. ए. रशीद यांना भारतीय दंड विधान १२० (B) आणि साक्षीपुरावा अधिनियम १० नुसार सह-आरोपी करण्याची मागणी



हाच तो देशद्रोही सुपारीबाज, दलाल टोळीचा म्होरक्या ॲड. मिलींद साठे

*प्रतिनिधी/ ४ ऑक्टोंबर*

**मुंबई :** सुपारी घेऊन बॉम्बे बार असोसिएशनच्या नावाचा दुरूपयोग करून भ्रष्ट, अकार्यक्षम लोकांना वाचविण्यासाठी केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालय, इंडियन बार असोसिएशनचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांविरुद्ध खोटे व बिनबुडाचे आरोप करणारा दलाल मिलींद साठे याच्याविरोधातील सर्व पुरावे, स्टींग ऑपरेशनच्या सिडीसह एक सविस्तर तक्रार सरन्यायाधीश रंजन गोगोई आणि सीबीआयकडे दाखल करण्यात आली असून सुप्रिम कोर्टाच्या कॉलेजियम विरुध्द अवमानानाजनक आरोप करून ते प्रकाशीत केल्यामुळे मिलींद साठे आणि त्याच्या बेकायदेशीर कटात सामील इतर आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान १९२, १९९, २१८, २०१, ४६९, ४७१, ४७४ r/w १२० (B) & ३४ अंतर्गत फौजदारी कारवाई आणि कंटेम्ट ऑफ कोर्ट ॲक्ट १९७१ अंतर्गत कोर्ट अवमाननाची कारवाई करण्याकरीता जनहित याचिका (PIL) ही सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात येणार असल्याची माहिती इंडियन बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दै. साहसिकशी बोलताना दिली.

नुकतेच दि. २ जुलै २०१९ रोजी इंडियन बार असोसिएशन (IBA) चे महाराष्ट्र ॲन्ड गोवाचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले यांनी ॲड. मिलींद साठे यांना नोटीस तामील करून त्यांच्या दलालीसंबधी उघड आरोप केले होते. परंतु मिलींद साठे यांना स्वत:च्या गुन्हेगारी कृत्यांची जाण असल्यामुळे व इंडियन बार असोसिएशनकडे सबळ पुरावे असल्यामुळे **'साठे'** यांनी न्यायालयात जाण्याची हिंमत केली नाही. कारण ते सर्व आरोप खरे होते.

### दलाल मिलींद साठे विरुद्ध इंडियन बार असोसिएशनचे आरोप व पुरावे

**अपराध क्र. १ :-** दि. २६ सप्टेंबर २०१९ रोजी दलाल मिलींद साठेने बॉम्बे बार असोसिएशन तर्फे एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यामध्ये त्याने असे म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने दि.२० सप्टेंबर २०१९ रोजी न्या. अकील. ए. कुरेशी यांना मध्य प्रदेश उच्च न्यायालय ऐवजी त्रिपुरा उच्च न्यायालयात पाठविण्याचा जो निर्णय घेतला तो सरकारच्या दबावाखाली घेतला व ही बाब बेकायदेशीर आहे. परंतु सत्य परिस्थीती अशी आहे की, न्या. ए. ए. कुरेशी व न्या. एस. जे. काथावाला यांच्या गंभीर फौजदारी गुन्ह्यासंदर्भात एक तक्रार नुकतीच इंडियन बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले यांनी मा.राष्ट्रपती यांच्याकडे दिली होती व ती तक्रार कायदा व न्याय विभागाकडे देण्यात आली होती. आणि कायदा व न्याय (Department of Law & Justice) विभागाच्या रिपोर्टच्या आधारावर सुप्रिम कोर्ट कॉलेजिअमने न्या. ए. ए. कुरेशी यांची बदली त्रिपुरा येथे केल्याचे दि. २० सप्टेंबर २०१९ च्या निर्णयात नमूद केले आहे. परंतू कोणतेही सबळ कारण किंवा पुरावा नसताना सुपारीबाज मिलींद साठेने सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश व कॉलेजियम यांच्याविरोधात आरोप करून व ते प्रकाशित करून सर्व जनतेच्या मनात न्यायव्यवस्थेविषयी आदर कमी करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्याविरोधात कोर्ट अवमाननाची कारवाई करण्याकरीता याचिका दाखल करण्यात येत आहे.

**अपराध क्र. २ :-** मिलींद साठे याने दि. २९ जुलै २०१९ रोजी जनहित याचिका क्र. २८/२०१७ कमलाकर शिनॉय वि. शासन या प्रकरणात **'म्हाडा'** तर्फे वकिल म्हणून युक्तिवाद केला. परंतु त्याआधी याचिका क्र २६४६ / २०१४ आणि ६३९ /

(उर्वरित पान २ वर)

# उमेदवारी नाकारल्याबद्दल मी आत्मपरीक्षण करत आहे : तावडे



*प्रतिनिधी/ ४ ऑक्टोंबर*

**मुंबई :** राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री असणाऱ्या विनोद तावडे यांचे नाव भाजपाच्या उमेदवारांच्या यादीमध्ये न आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते. शिवाय तावडेंबरोबरच भाजपाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाही उमेदवारीपासून दूर ठेवण्यात आल्याने सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर तावडे यांनी पत्रकारपरिषदेद्वारे आपली भूमिका व्यक्त करताना म्हटले आहे की, मला बोरीवलीमधून तिकीट का नाही दिले? याचे मी आत्मपरीक्षण करत आहे. मला असे वाटते की, पक्षही याचा विचार करेल. पक्षाचे काही चुकले असेल तर पक्षही याबाबत विचार करेल. पण आज निवडणुकीच्या काळामध्ये कोणाचे चुकले कोणाचे बरोबर आहे, याचा विचार करण्याचा वेळ नाही. मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वंयसेवक आहे. विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे आम्ही राजकारणामध्ये ही स्वयंसेवक आणि कार्यकर्ता म्हणून काम करतो. हे करत असताना खरा उद्देश आणि लक्ष्य आहे ते राष्ट्र निर्माणाचं. समाज कल्याणाचे. आमदारकी असेल, विरोधी पक्ष नेता असेल, पक्षाचा अध्यक्ष असेल, सरचिटणीस असेल किंवा मंत्री असेल, ही

(उर्वरित पान २ वर)

# चंद्रशेखर बावनकुळेंचा पत्ता कट; भाजपाकडून सावरकरांना उमेदवारी





*प्रतिनिधी/ ४ ऑक्टोंबर*

**नागपूर :** भाजपाने कामठी मतदारसंघातील उमेदवाराच्या नावाचा सस्पेन्स शेवटपर्यंत कायम ठेवला. उमेदवारी भरण्याच्या काही तासआधी अचानक नावाची घोषणा करत राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना धक्का दिला. भाजपाने चंद्रशेखर बावनकुळे यांचा उमेदवारीचा पत्ता कट करत टेकचंद सावरकरांना कामठीतून उमेदवारी दिली आहे. त्यामुळे बावनकुळे समर्थक संतप्त झाले आहेत.

बावनकुळे यांच्याऐवजी त्यांच्या पत्नी ज्योती बावनकुळे यांना उमेदवारी मिळेल, असेही बोलले जात होते. बावनकुळे यांनी आज सकाळी मुख्यमंत्र्यांची भेटही घेतली होती. मात्र, त्याचे सर्व प्रयत्न फोल ठरल्याचं दिसत आहे. त्यांच्या ऐवजी भाजपनं टेकचंद सावरकर यांना उमेदवारी दिली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षात झालेल्या नेत्याच्या प्रचंड इनकमिंगमुळे भाजपातील अनेक निष्ठावंताची उमेदवारी गेली आहे. यात खडसे, तावडेंपासून ते अनेक विद्यमान आमदारांचाही समावेश आहे. राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाही पक्षाने शेवटच्या क्षणापर्यंत ताटकळ ठेवले. अखेर यादीची वाट बघून थकलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पत्नी ज्योती बावनकुळे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. त्यामुळं भाजपचे अधिकृत उमेदवार टेकचंद सावरकरांसाठी ही निवडणूक आव्हानात्मक ठरणार असल्याचं दिसत आहे.

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे माजी

(उर्वरित पान २ वर)

## यादीची वाट बघून थकलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पत्नीने भरला अपक्ष अर्ज

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षात झालेल्या नेत्याच्या प्रचंड इनकमिंगमुळे भाजपातील अनेक निष्ठावंताची उमेदवारी गेली आहे. यात खडसे, तावडेंपासून ते अनेक विद्यमान आमदारांचाही समावेश आहे. राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाही पक्षाने शेवटच्या क्षणापर्यंत ताटकळ ठेवले असून, यादीची वाट बघून थकलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पत्नी ज्योती बावनकुळे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आता सुरू होईल. पण त्याआधी उमेदवारीवरून चांगलेच नाट्य रंगले आहे. भाजपाचे ज्येष्ट नेते आणि राज्याचे माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे, सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांच्यासह अनेक विद्यमान आमदारांना भाजपाने डच्चू दिला आहे. सर्व मतदारसंघातील उमेदवारांच्या नावाची घोषणा केल्यानंतरही भाजपाने नागपूरमधील कामठी मतदारसंघातील उमेदवारीचा निर्णय बराच ताणून धरला आहे.

ऐनवेळी खडसे यांच्याऐवजी त्यांची कन्या रोहिणी खडसे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे बावनकुळे यांच्या पत्नीला उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा सुरू झाली. मात्र, त्याबाबतही लवकर निर्णय होत नसल्याने चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पत्नी ज्योती बावनकुळे यांनी शुक्रवारी दुपारी दोन वाजता उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. ज्योती बावनकुळे यांचा अर्ज दाखल झाला असली, तरी कामठी मतदारसंघातून भाजपाचा उमेदवार कोण असेल हे अजूनही गुलदस्त्यात आहे.

# तिकीटं कापली नाहीत, जबाबदाऱ्या बदलल्या : फडणवीस



*विशेष प्रतिनिधी/ ४ ऑक्टोंबर*

**मुंबई :** भाजपने कोणाचेही तिकीट कापलेले नाही, फक्त जबाबर्दाय़ा बदलल्या आहेत, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते शुक्रवारी मुंबईतील पत्रकारपरिषदेत बोलत होते. यावेळी त्यांना एकनाथ खडसे, विनोद तावडे, चंद्रशेखर बावनकुळे, प्रकाश मेहता आणि राजपुरोहित या भाजपच्या बड्या नेत्यांची तिकीटे का कापण्यात आली, असा सवाल विचारण्यात आला.

या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, पक्षामध्ये जबाबदाऱ्या बदलत असतात. त्यामुळे नेत्यांची तिकीट कापलं असं म्हणणं योग्य ठरणार नाही. ती जबाबदारी फक्त दुसऱ्या कार्यकर्त्याला देण्यात आली आहे. पक्षात अशाप्रकारे कार्यकर्त्यांच्या भूमिका बदलत असतात. काहीजण विधानसभेत असतात तर काहीजण विधानसभेबाहेर राहून पक्षाचे काम करतात, असे फडणवीस यांनी सांगितले.

भाजपकडून यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एकनाथ खडसे, विनोद तावडे, चंद्रशेखर बावनकुळे, प्रकाश मेहता या मंत्रीपद भुषविलेल्या नेत्यांना उमेदवारी नाकारली आहे. भाजपमधील अंतर्गत राजकारणामुळे या सगळ्यांचे पत्ते कट झाले, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

मुलीसाठी बापानं सोडलं उमेदवारीवर पाणी, 'नाराज' खडसेंचा सूर नरमला

दरम्यान, यापैकी एकाही नेत्याने बंडखोरीचे निशाण फडकावलेले नाही. एकनाथ खडसे यांच्याऐवजी त्यांची कन्या रोहिणी खडसे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे पक्षाचा आदेश मान्य करून कामाला लागा, असा सल्ला खडसे यांनी कार्यकर्त्यांना दिला. तर विनोद तावडे यांनीही माझे तिकीट कापल्यामुळे प्रचारावर कोणताही परिणाम होणार नाही, असे स्पष्ट केले. फक्त निवडणूक झाल्यानंतर मला यामागील कारण समजून घ्यायचे आहे, असे त्यांनी सांगितले.

# कणकवलीत शिवसेना-भाजपा आमने-सामने, नितेश राणेंना सावंत यांचे आव्हान

*विशेष प्रतिनिधी/ ४ ऑक्टोंबर*

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांचे सुपूत्र नितेश राणे यांना उमेदवारी दिल्यामुळे कणकवलीत शिवसेना-भाजपा आमने-सामने आले आहेत. काल भाजपाने छोटेखानी समारंभात नितेश राणेंना पक्षात प्रवेश देऊन कणकवलीतून उमेदवारी दिली. शिवसेनेचा नारायण राणे आणि त्यांच्या मुलांच्या उमेदवारीला प्रखर विरोध आहे. त्यामुळे शिवसेनेने राणेंचेच एकेकाळचे सहकारी

(उर्वरित पान २ वर)